नि.दि.मु. क्र. १३/२००५
निशाण नं. २४५ लगत
CNR No.: MHSI05-000049-2005

**उलटपास वादी तर्फे वकील श्री. एस्. एन्. भणगे यांचे मार्फत**

२७. (साक्षीदाराला पुन्हा निशाण ८ वरील फेरफाराचा उतारा दाखविण्यात आला.) हे म्हणणे खरे आहे की सदर फेरफारमध्ये वादी याची कुळ म्हणुन १९४८ सालात नोंद झाल्याचे दिसून येते. मात्र सदर नोंद खोटी आहे.

२८. हे म्हणणे खरे आहे की १९२६ सालापासून मी देवस्थानाकडून दावा जमिनी कुळ म्हणुन स्विकारली असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझेकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की दाव्यातील मिळकती या माझेकडे देवस्थानाकडून कुळपणास आहेत असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा आजरोजी पर्यंत माझेकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकतीमध्ये मी झाडांची लागवड केली हे दर्शविण्यासाठी माझेकडे लेखी पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की गोविंद भिसाजी मडवळ हे देवस्थानाला प्रतिवर्षी दोन रुपये असा खंड सन १९२७ ते १९४५ पर्यंत अदा करत होते असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझेकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की आत्माराम गोविंद मडवळ हे देवस्थानाला प्रतिवर्शी पाच रुपये असा खंड सन १९४६ ते १९८७ पर्यंत अदा करत होते असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझेकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की आम्ही प्रतिवादी १ ते ३ हे देवस्थानाला प्रतिवर्षी दहा रुपये असा खंड सन १९८८ पासून आजमितीपर्यंत अदा करत आलेले आहोत असे दाखविणरा कागदोपत्री पुरावा माझेकडे नाही.

२९. हे म्हणणे खरे आहे की वेतोबा देवस्थान हे नोंदणीकृत देवस्थान आहे. हे म्हणणे खरे आहे की देवस्थानाचा सर्व हिशोब ठेवला जातो. हे म्हणणे खरे आहे की आम्ही देवस्थानाला माझे म्हणण्याप्रमाणे जो काही वेळोवेळी खंड दिलेला आहे त्याची नोंद देवस्थानाकडे करण्यात आलेली आहे असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी याकामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकतीमध्ये आम्ही विहीर खणली असे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा माझेकडे नाही.

३०.        याकामी कुळपणा दर्शविण्यासाठी खंडाची पावती, दस्ताची पावती आणि कबुलायत अशा स्वरुपाचे कागदपत्र सादर केलेले नाहीत. साक्षीदार स्वत:हून सांगतो की तशी वेळ न आल्याने मी हजर केलेले नाहीत.

प्रश्न— सदर कागदपत्र तुम्ही केव्हा हजर करु शकता?

उत्तर— देवस्थानाकडून घेवून हजर करु शकतो.

हे म्हणणे खरे आहे की खंडाची पावती, कबुलायत व दस्ताची पावती हे कागदपत्र माझे ताब्यात नाहीत.

३१.   (साक्षीदाराला निशाण २३० वरील सातबारा उतारा दाखविण्यात आला.)

प्रश्न— हा सातबारा कोणाचा आहे?

उत्तर— मला वाचता येत नाही.

हे म्हणणे खरे आहे की माझे सरतपासात जे कागद मला दर्शविण्यात आले ते मला वाचायला आले नव्हते.

३२.  प्रश्न— निशाण २४५ वरील कागद तुम्हाला वाचता येईल का?

उत्तर— मला वाचता येत नाही.  आम्ही भावांनी वाचलेले आहे.

हे म्हणणे खरे आहे की या दाव्यामध्ये वादी व प्रतिवादी यांनी जे कागद हजर केले ते दाखविल्यास मला ते वाचता येणार नाही.

प्रश्न— निशाण ८ वरील कागद तुम्हाला दाखविला असता तो खोटा आहे असे तुम्ही कसे सांगितले?

उत्तर— मला तो कागद खोटा आहे असे वाटले म्हणुन मी तो कागद खोटा आहे असे सांगितले.

३३.        (साक्षीदाराला निशाण २९२ ते २९४, २९६ आणि २९७ वरील कागद दाखविण्यात आले.)  हे म्हणणे खरे आहे की सदर कागद काय आहे, त्याच्यामध्ये काय लिहीलेले आहे हे मला वाचता येणार नाही.

प्रश्न— तुम्ही वादीनी सांगितलेली कागदपत्र खोटी आहेत हे सांगण्यासाठी साक्षीला आला आहात?

उत्तर— तुम्ही जे प्रश्न विचाराल त्याचे उत्तर द्यायला मी आलो आहे.

वादीने या कामी सादर केलेले कागदपत्र मी पाहिले होते.

प्रश्न— वादीने सादर केलेले कागद तुम्ही स्वत: वाचलेले नाहीत?

उत्तर— मला वाचता येत नाही. मी पुन्हा पुन्हा तेच सांगत आहे की मला वाचता येत नाही.

३४. वादीने या कामी सादर केलेल्या खंडाच्या पावत्या मी व माझे भावाने पाहिलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की त्या खंडाच्या पावत्या वेतोबा देवस्थानाने दिलेल्या आहेत.

प्रश्न— तुम्हाला देवस्थानाला खंड देवून त्याची पावती देवस्थानाकडून घ्यायला काही अडचण नव्हती?

उत्तर— मला त्याची कल्पना नाही. माझे वडिल त्याबाबत व्यवहार बघत होते.

३५. प्रश्न— तुम्हाला व तुमच्या भावांना खंडाची पावती देवस्थानाकडून घ्यायला काही अडचण नव्हती?

उत्तर— भावांनी पावती घेतल्यात पण त्या कोठे ठेवल्या मला माहिती नाही.

३६. मी माझे भावाला विचारुन साक्ष देत आहे. मला त्यांची फार माहिती नाही.

प्रश्न— तुम्ही तुमच्या भावांना खंडाच्या पावत्या कोठे ठेवल्या हे विचारले नाही का?

उत्तर— आम्ही १५ वर्षापासून पावत्या घेतल्या नाहीत. आम्हाला स्टे लागला होता.

स्टे लागण्यापूर्वीच्या पावत्या कोठे ठेवल्या हे मी माझे भावाला विचारले नाही. देवस्थानाने खंडाच्या पावत्या आमच्या कुटुंबाला दिल्या असे मी स्वत: कधी बघितले नाही.

३७. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीचे क्षेत्र मला सांगता येणार नाही.

प्रश्न— दावा मिळकतीच्या सातबारामधील पिकपाणीमध्ये काय नोंदी आहेत हे तुम्ही पाहिले का?

उत्तर— मी वाचलेले नाही.

प्रश्न— दावा मिळकतीमध्ये सादर कागदपत्र तुम्ही स्वत: वाचून बघितले नाहीत?

उत्तर— मला वाचता येत नाही.

३८. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीचे १९२६ पासून आम्ही कुळ आहोत असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीमध्ये माझे आजोबांनी व वडिलांनी व आम्ही वेळोवेळी खंड दिलेला आहे असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीमध्ये आमच्या उपर्जनेची काजु, कोकम, सुरंग व माड अशी उपर्जनेची झाडे आहेत असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीतील विहिरीशी माझा काही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकत ही वादी कुटुंबाकडे कुळ म्हणुन कब्जा भोग्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की १९४८ साली वादी कुटुबाची कुळ म्हणुन जी नोंद झाली ती ते दावा मिळकतीत कुळ असल्यामुळे झाली. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीचा खंड वादी कुटुंब देवस्थानाला देत आलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की दावा जमिनीमध्ये वादी यांची कुळ म्हणुन जी नोंद झाली ती खोटी आहे असे माझे म्हणणे चुकीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की मला चांगले वाचायला येत असताना देखील आजरोजी मला वाचायला येत नाही असे मी कोर्टासमोर खोटे नाटक करत आहे. हे म्हणणे खरे आहे की मी व वादी एकाच शाळेत शिकलो. मी पुढे कोण साक्षीदार तपासणार हे आता ठरविले नाही.

**उर्वरीत उलटतपास वादीतर्फे वकिलांचे विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

DISTRICT COURT, MAHARASHTRA

Digitally signed by Vinayak Dattatray Patil
Date: 2020.01.10 17:21:02 +0530

दिनांक :— ०८/०१/२०२०.

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.